**असुधारित प्रत**

# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक ५ मार्च, २०२१

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : शोक प्रस्ताव -**

श्री.माणिकराव प्रल्हादराव गावंडे, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री :**

**(क)** महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे मा. राज्यपाल महोदयांना सादर केलेले सन २०१३ चे २, सन २०१४ चे २३, सन २०१५ चे २, सन २०१६ चे ३, सन २०१८ चा १ आणि सन २०१९ चा १ असे एकूण ३२ विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उप मुख्यमंत्री :**

महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२०-२०२१ हे प्रकाशन सभागृहासमोर ठेवतील.

**(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री, :**

विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **सार्वजनिक बांधकाम विभागाचे** सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(४) **नगरविकास मंत्री** : **(क)** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **नगर विकास विभागाचे** सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लिमिटेड यांचा सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड यांचा सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** सन २०१५ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनामध्ये "**मेट्रो ३ च्या भुयारी प्रकल्पामुळे प्रकल्पाच्या परिसरातील हजारो इमारती व कुटूंबावर विपरीत परिणाम होणे**" या विषयावरील श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांच्या दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी उत्तरीत झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

(५) **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री,** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे**

सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(६) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे** सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(७) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे** सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(८) महिला व बालविकास मंत्री** : महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) (सुधारणा) नियम, २०२० प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक बा.न्या.म.-२०१९/प्र.क्र.१२७/का-०३, दिनांकित २८ डिसेंबर, २०२० सभागृहासमोर ठेवतील.

**(९) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** : सन २०१७ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनामध्ये **"चेंबूर येथील शासनाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारा आहार निकृष्ट असणे"** या विषयावरील डॉ.बालाजी किणीकर व इतर वि.स.स. यांच्या दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी उत्तरीत झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

**चार : अंदाज समितीचा पहिला व दुसरा अहवाल सभागृहास सादर करणे**

**पाच : मा.समिती प्रमुख, विधानसभा विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव**

विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

(१) सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी श्री.अर्णब गोस्वामी, संपादक, वृत्त निवेदक व कार्यक्रम सूत्र संचालक, रिपब्लिक टिव्ही वृत्तवाहिनी यांचेविरुद्ध दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

(२) सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी हिंदी सिने अभिनेत्री कंगना राणावत यांचेविरुद्ध दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचे अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियम १८३(१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

**सहा : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**सात : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ – महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विधेयक, २०२१.

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(क) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ – महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२१.**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ – महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२१ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ – महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२१ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(गुरुवार, दिनांक ४ मार्च, २०२१ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

आठ : **सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड.आशिष शेलार, डॉ.संजय कुटे, सर्वश्री रवि राणा, संभाजी पाटील-निलंगेकर, अतुल भातखळकर, राम कदम, गणेश नाईक, नितेश राणे, जयकुमार रावल, गिरीष महाजन, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री समीर कुणावार, बबनराव लोणीकर, सुनील राणे, हरीभाऊ बागडे, अभिमन्यु पवार, सचिन कल्याणशेट्टी, शिवेंद्रसिंह भोसले, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड पराग अळवणी, सर्वश्री मंगलप्रभात लोढा, रणधीर सावरकर, मोहन मते, संतोष दानवे, प्रशांत बंब, अमित साटम, सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर, ॲड राहुल कुल, सर्वश्री सिध्दार्थ शिरोळे, जयकुमार गोरे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरू)**

"राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, हत्या, अपहरण, दरोडे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली वाढ, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या

घटनांमध्ये झालेली वाढ, पुणे येथे पुजा चव्हाण आत्महत्या प्रकरणी संशयित मंत्र्यांचा राजीनामा घेतला असला तरी तो तीन दिवसांनंतरही राज्यपालांकडे पाठविलेला नसल्यामुळे जनतेच्या मनात निर्माण झालेला संभ्रम, या प्रकरणी २४ दिवसांचा कालावधी होऊनही गुन्हा दाखल झालेला नसून तपासाबाबत राज्यातील जनतेला अंधारात ठेवले असणे, पारदर्शक पध्दतीने तपास होण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेकडे तपास देण्याची आवश्यकता, ज्येष्ठ नागरिकांसंबंधीच्या गुन्ह्यात झालेली वाढ, डान्सबारला आळा घालण्यात आलेले अपयश, सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, पोलिसांवर पडणारा ताण, पुणे, नागपूर, नाशिक या सारख्या शहरात संघटित गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळूमाफियांकडून, अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांकडून, शासकीय अधिकाऱ्यांवर होणारे हल्ले व जीवे मारण्याच्या धमक्या, कोरोना काळात पोलिसांवर झालेले हल्ले, सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्यांना मिळालेले मोकळे रान, सामाजिक अत्याचारात झालेली वाढ, महान कलाकारांची गुप्तहेरांमार्फत चौकशी करण्याचा सरकारने घेतलेला घृणास्पद निर्णय, गुंडाराजच होत असलेलं उदात्तीकरण, राज्यावर घातपाती कारवायांचे असलेले गंभीर सावट, जातीय हिंसाचारात झालेली वाढ, जातपंचायतीच्या अत्याचाराच्या समोर आलेल्या घटना, तसेच, मुंबईतील अनेक मोठ्या व जनउपयोगी प्रकल्पांचे रखडलेले काम, वाहतुकीचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचार व अनियमिततेची प्रकरणे, पुनर्विकास प्रकल्पांची रखडलेली कामे, मुंबईच्या विविध समस्यांनी धारण केलेले उग्र स्वरुप, मुंबईतील रखडलेली विकास कामे, महानगरपालिकेने गेल्या १० वर्षात केलेला खर्च, याबाबत श्वेतपत्रिका जाहीर करण्याची होत असलेली मागणी, मुंबईतील मेट्रोची कारशेड कांजूरमार्गलाच करण्याबाबत सरकारने धरलेला दुराग्रह त्यातून मेट्रोला होणारा विलंब व मुंबईकरांचे होणारे नुकसान, कोस्टल रोडच्या कामामुळे मच्छीमारांचे निर्माण झालेले प्रश्न, धारावी पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लावण्यात होत असलेला विलंब, उपकर प्राप्त इमारतींचा प्रश्न, देवनार डम्पिंग ग्राउंडचा प्रश्न, बीडीडी चाळींच्या पुनर्विकासातील समस्या यासारख्या मुंबईच्या समस्यांकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन, सेस इमारतींचा प्रश्न, पुनर्बांधणी, स्वयंपुनर्बांधणी, परवडणारी घरे, भाडयाची घरे, महाकाय प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्यांच्या समस्या, मास हाऊसिंग सारखे प्रश्न व त्याबाबतच्या उपाययोजनांमध्ये निर्माण झालेल्या समस्या, तसेच कोरोना प्रादुर्भाव व मृत्यूची संख्या देशपातळीवर महाराष्ट्रात सर्वाधिक, कोरोना उपाययोजनात झालेला भ्रष्टाचार, टाळेबंदीमुळे अडचणीत आलेल्यांना सरकारने पॅकेजेस देण्यात केलेली कुचराई, सत्तारुढ पक्षाच्या नेत्यांकडून कोरोना नियमांचे झालेले उल्लंघन, कोरोना हाताळण्यात सरकारला आलेले अपयश, तसेच राज्यातील विविध विभागांचा संतुलित विकास करण्यात व टाळेबंदी शिथिलीकरणानंतर या विभागांचे अर्थचक्र सुरळीत करण्यात सरकारला आलेले अपयश, राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, मराठा, धनगर, आर्थिकदृष्टया मागास यांच्यासाठीच्या योजना राबवण्यात, त्याचा लाभ देण्यात सरकारला आलेले अपयश, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## अशासकीय कामकाज

## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**नऊ : अशासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ :**

(१) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.अतुल भातखळकर, श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र चिकित्सालयीन आस्थापना (नोंदणी व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.अतुल भातखळकर, श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची माता-पित्याप्रती जबाबदारी आणि उत्तरदायित्व व देखभाल यासंबंधीच्या मानकांबाबत विधेयक, २०२० - **श्री.अमीत साटम, श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(५) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र राज्यात लैंगिक अपराधास प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिराती फलक लावण्यास तसेच यासंदर्भातील अनेक संकेतस्थळांवर व समाजमाध्यमांवर प्रतिबंध करण्यास तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२० - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(६) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ - महाराष्ट्र वेश्म मालकी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(७) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - जमिन-महसूलाच्या माफीबाबत (क्रमांक १) (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(८) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक २०२० - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(९) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - राज्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२० - **श्री.प्रकाश आबिटकर, श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(१०) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक २०२० - **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.**

(११) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.सुनील प्रभू, वि.स.स. यांचे.**

**दहा : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**(दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले परंतु चर्चा न झालेले अशासकीय ठराव) (क्रमांक १ ते ३)**

(१) **श्री. गणेश नाईक, वि.स.स. यांचा ठराव क्र. २१८**

"राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांचा ठराव क्र. ५५**

"मुंबईसह राज्यात रेल्वेचे सर्वाधिक जाळे पसरलेले असणे, सर्वाधिक महसूल प्राप्त होवूनही केंद्राकडून पूरेशा प्रमाणात राज्यास निधी प्राप्त न होणे, महिला सुरक्षा, प्रलंबित योजना, रेल्वे समस्या, सुरक्षित प्रवास आणि प्रवाशांना अत्याधुनिक सेवा सुविधांकरीता आवश्यक निधीची तरतूद करुन व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याकरिता

'स्वतंत्र महाराष्ट्र रेल महामंडळ' स्थापन करावे अशी आग्रही मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **श्री. राणाजगजीतसिंह पाटील, वि.स.स. यांचा ठराव क्र. ६५**

"शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : ४ मार्च, २०२१

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा